Listening Passages

## मनाचा गोंधळ

आजकाल सगळीकडे असे दिसते की तुमचे एक काम संपत नाही तरी दुसरे काम करायला तुम्ही सुरुवात करता. कधी कधी वेड्यासारखे नको त्या गोष्टीमध्ये वेळ घालविता. मग व्यायाम, अभ्यास इ. करायला वेळ मिळत नाही. दररोज सेल फोन, आयपॅड, टीव्ही इ. पाहिले नाही तर काहीतरी चुकल्यासारखे वाटते. जग आपल्यापासून तुटले असे वाटते. थांबा व एक क्षण विचार करा. ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. एखादी शांत जागा शोधा, दीर्घ श्वास घ्या आणि मनातील गोंधळ व काळजी दूर करा. नंतर कागदावर महत्वाच्या गोष्टी लिहा. एका वेळी एकच गोष्ट करा. तुम्हाला आनंद होईल आणि वाटेल की सगळे किती सोपे आहे.

१) आपण एका वेळी दोन कामे केली तर काय होईल?
२) जग आपल्यापासून तुटले असे कधी वाटते?
३) कोणत्या गोष्टींना महत्व द्यावे?
४) मन शांत ठेवण्यासाठी काय करावे?
५) तुम्ही दिवसाचा वेळ कसा घालविता?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Listening Passages

# झाडाचे वय

भारतीय संस्कृतीत वृक्षांना देव मानले जाते. ते आपल्याला फळे, फुले आणि सावली देतात. जितकी झाडे जास्त असतील तितकी पर्यावरणाला मदत होते. झाडाचे वय मोजण्याची जुनी पद्धत आहे. झाड आडवे कापले की त्यावर एकमेकांभोवती पसरलेली वर्तुळे दिसतात. प्रत्येक झाड दर वर्षी एक वर्तुळ तयार करते. सर्वात ताजे वर्तुळ बाहेरच्या बाजुला असते आणि सर्वात जुने वर्तुळ मध्यभागी असतं. साधारणपणे दर वर्षी एका वर्तुळाची भर पडत असल्यामुळे जितकी वर्तुळे तितके त्या झाडाचं वय असे म्हणता येईल. कॅलिफोर्निआत रेडवूड व सिकोया नावाची खूप उंच व जुनी झाडे आहेत. सर्वांत जुनी झाडे २५०० ते ३००० वर्षांची आहेत. रेडवूड झाडे ३७० फुट उंच व त्याचा बुंधा २२ फुट असतो तर सिकोया झाडे ३०० फुट उंच, बुंधा ४० फुट असतो.

१) झाडापासून काय मिळते?
२) झाड किती जुने आहे हे कसे सांगता येते?
३) सर्वात जुने वर्तुळ कुठे असते?
४) कॅलिफोर्निआत कोणती विशिष्ट झाडे आहेत?
५) त्या झाडांची माहिती सांगा.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Passages

# गणित तज्ञ

अमेरिकेत १९५३ साली, एक अत्यंत हुशार गणित तज्ञ , आफ्रिकन अमेरिकन बाई “नासा” मध्ये नोकरी करीत होती. ती गणितातील अत्यंत अवघड, खूप कठीण व किचकट असलेले प्रश्न सोडवायची. तिच्या अचूक उत्तराच्या आधारामुळे नासाची spaceships, lunar modules परीभ्रमणाकरिता अवकाशात उड्डाण करू लागली. ती हाताने कागदावर गणिते सोडवायची. नंतर कंप्युटर वापरून गणित कशी करायची यात तिचा पुढाकार होता. बराक ओबामा यांनी तिला मोठा पुरस्कार दिला. २०१९ साली तिला गोल्ड मेडल मिळाले. कोण होती ती? तिचे नाव “कॅथरीन जॉनसन” असे होते. (ऑगस्ट १९१८ – फेब्रुवारी २०२०)

१)नासात काम करणाऱ्या बाईचे नाव काय होते?
२)ती कोणते काम करायची?
३)तिचे काम महत्वाचे का होते?
४)तिला कोणते पुरस्कार मिळाले?
५)आजकाल अचूक उत्तरासाठी काय वापरले जाते?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Passages

## बायसन आणि बफेलो

लोक “बायसन” आणि “बफेलो” हा प्राणी एकच आहे असे समजतात. बफेलो म्हणजे म्हैस. जिला एशियन वॉटर बफेलो म्हणतात. तिची शिंगे मोठी व वळणदार असतात. म्हैस व बायसन हे गुरेढोरे या प्रकारात येतात. म्हैस पाळीव प्राणी म्हणून वापरतात. गाईच्या दुधाप्रमाणे म्हशीचे दूध वापरले जाते. पण बायसन मात्र वन्य प्राणी आहे. त्याला आखूड शिंगे व दाढी असते. तसेच अंगावर केस असतात व पाठीवर उंटाप्रमाणे उंचवटा असतो. बायसनचे वजन २००० पौंड असते. ते चारा, बेरी आणि फळे खातात. त्यांना गाई सारखी चार पोटे असतात. ते पोटातील चारा परत तोंडात आणून चावत चावत रवंथ करतात. बायसन जरी ते खूप मोठे असले तरी जोरात म्हणजे ३५ मैल वेगाने पळू शकतात.

१)म्हैस कशी असते ते सांगा.
२)बायसन कसा असतो ते सांगा.
३)म्हैस व बायसन यामध्ये फरक कोणता आहे?
४)गाई, म्हशी रवंथ करतात म्हणजे काय?
५)तुम्ही बायसन पाहिले आहेत का? कुठे?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.